RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ४४ (११)] सोमवार, मार्च ३०, २०२६/चैत्र ९, शके १९४८ [पृष्ठे ६ , किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मार्च, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम.**

क्रमांक खाक्षेस-२०२२/प्र.क्र.३४/रस्ते-८.— महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६५) याच्या कलम २० ची पोट-कलमे (१-अ), (१-ब), (१-क) आणि (१-इ), द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन घोषित करते की, सोलापूर शहरातील सुनिश्चित क्षेत्रातील (या अधिसूचने सोबतच्या 'अनुसूची दोन' मध्ये नमूद करण्यात आलेले), नव्याने बांधण्यात आलेले, बांधण्यात यावयाचे, तसेच सुधारणा करण्यात आलेले, करण्यात यावयाचे रेल्वे उड्डाण पूल, भूयारी मार्ग, नदीवरील पूल व रस्ते व त्यांचे जोडरस्ते वरील कलम २० च्या प्रयोजनासाठी "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" या योजनेतून निर्देशित केलेले दर व कालावधीसाठी साकल्याने एकच मानण्यात येतील. या कामांचा वापर करणाऱ्या खालील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारांच्या मोटार वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर अनुसूची-एक च्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या दराने दिनांक १ एप्रिल २०२६ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीकरिता खालील पथकर नाक्यांवर पथकर बसविण्यात आला आहे व तो पुढे चालू ठेवण्यात येत आहे. (१) सोलापूर होटगी रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ३९ वरील साखळी क्रमांक ७/६५० जवळील पथकर नाका, (२) सोलापूर बार्शी रस्त्यावर राज्य महामार्ग क्रमांक १५१ वरील साखळी क्रमांक ६१/९०० जवळील पथकर नाका, (३) सोलापूर देगाव मंगळवेढा प्रमुख राज्यमार्ग क्रमांक ३ वरील साखळी क्रमांक ३६५/९५० जवळील पथकर नाका आणि (४) सोलापूर अक्कलकोट रस्ता राज्य महामार्ग क्रमांक १५१ वरील साखळी क्रमांक ७९/९०० जवळील पथकर नाका.

## अनुसूची १

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | पथकराचे प्रतिफेरीचे दर (रुपये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | ०१/०४/२०२६ ते ३१/१२/२०२६ |
| १ | मोटार सायकल, स्कूटर, मोपेड आणि कोणतीही दुचाकी वाहने, रिकाम्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर, चालकाव्यतिरिक्त ३ प्रवासी वाहन क्षमता असलेल्या ऑटो रिक्षा. | निरंक |
| २ | मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये नमूद केल्याप्रमाणे हलकी मोटार वाहने. अ) कार, जीप, टाटा सुमो, ट्रॅक्स, वाहन चालक वगळून सहा आसनी प्रवासी रिक्षा व इतर तत्सम वाहने (चालक वगळून १२ प्रवासी क्षमता असलेली) | निरंक |
| | ब) मिनी बस किंवा तत्सम वाहने (चालक वगळून १२ पेक्षा अधिक आणि २० पर्यंत प्रवासी वाहन क्षमतेची) आणि अनुक्रमांक ३ आणि ४ मध्ये नमूद नसलेली माल वाहतुकीची वाहने. | ६० |
| ३ | ट्रक, बस. | १०५ |
| ४ | मोटार वाहन अधिनियम- १९८८ (१९८८ चा ५९) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे व अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेली वाहने वगळून अवजड वाहने उदा. ट्रक-ट्रेलर, दोन पेक्षा अधिक आसांची वाहने. | १२५ |

**टिपा.—**

१. जर एखाद्या वाहन धारकाने ५० किंवा १०० कुपन्स असलेली पथकर पुस्तिका आगाऊ खरेदी केल्यास त्यास पुस्तिकेच्या किंमतीमध्ये अनुक्रमे २५ टक्के व ५० टक्के सवलत देण्यात येईल.

२. खालील वाहनांना पथकरातून सूट देण्यात येईल :—

(१) केंद्र व राज्य शासकीय वाहने.

(२) लष्करी वाहने.

(३) पोलिस दलाची वाहने.

(४) अग्निशमन दलाची वाहने.

(५) रुग्णवाहिका.

(६) शववाहिका.

(७) टपाल व तार खात्याची वाहने.

(८) लोकसभा व राज्यसभेचे विद्यमान सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

(९) लोकसभा व राज्यसभेचे माजी सदस्य तसेच महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सदस्य प्रवास करीत असलेली वाहने.

(१०) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस (एस.टी.).

(११) स्कुल बसेस.

३. या प्रयोजनाकरीता उपरोल्लेखित रस्त्यांवरील या अधिसूचनेत नमूद केलेल्या पथकर नाक्यांवर पथकराची संपूर्ण रक्कम वसूल करण्याचा आणि ठेवून घेण्याचा हक्क महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना प्रदान करण्यात आला आहे.

## अनुसूची २

खालील नव्याने बांधण्यात आलेले, यावयाचे रेल्वे उड्डाणपूल, भुयारी मार्ग, नदीवरील पूल व रस्ते व त्यांचे जोड रस्ते ही सर्व कामे कलम २० च्या प्रयोजनासाठी एकच समूह घोषित करण्यात येत आहेत.

### (अ) महानगरपालिका क्षेत्रातील कामे

| अ.क्र. (१) | कामाचे नाव (२) |
|---|---|
| १ | रेल्वे उड्डाणपूल व भुयारी मार्ग (लेव्हल क्रॉसिंग गेट क्रमांक ५५). |
| २ | रेल्वे उड्डाणपूल (२०० फूट रुंद डी पी. रस्त्यावरील). |
| ३ | भैया चौक ते कोयना नगर रस्ता (रेल्वे पुलाचे रुंदीकरण व नाल्यावरील पुलासह). |
| ४ | नवी वेस चौकी- सरस्वती चौक –जुना एम्प्लॉयमेंट चौक- विश्रामगृह रस्ता |
| ५ | शिवाजी चौक-सम्राट चौक-दयानंद कॉलेज बोरामणी नाका-अशोक चौक-गुरुनानक चौक ते राज्य मार्ग क्रमांक १३ रस्ता (रेल्वे पुलाजवळ). |
| ६ | जुना पुणे नाका ते राज्य मार्ग क्रमांक १३ (एसआरपी कॅम्प, सोरेगाव) बाह्यवळण रस्ता. |
| ७ | भैय्या चौक महापालिका पंचकट्टा विजापूर वेस शांतीचौक. |
| ८ | होटगी रस्ता – भारती विद्यापीठ –रेल्वे सोसायटी-चैतन्य शॉपिंग सेंटर ते राज्य मार्ग क्रमांक १३ या मार्गावरील रस्त्याची सुधारणा पूल बांधणेसह. |
| ९ | कृषी उत्पन्न बाजार समिती चौक-अक्कलकोट रस्ता –लोकमान्य चौक-कुमठा नाका-होटगी रस्ता-जुळे सोलापूर ते राज्य मार्ग क्रमांक १३. |
| १० | शिवाजी चौक –बाळी वेस-टिळक चौक-कोथम चौक-कन्या चौक-भिलाबाई चौक. |
| ११ | गांधी नगर-शासकीय रुग्णालय –बारा इमाम चौक-कोथम चौक –कुंभार वेस –बलिदान चौक. |
| १२ | विकास आराखड्यातील प्रस्तावित २१ ठिकाणी चौक सुधारणा. |
| १३ | पारस इस्टेट ते समाचार चौक रस्त्याचे रुंदीकरण. |
| १४ | झोपडपट्टी भांडार ते विव्हको प्रोसेस. |

### (ब) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील सोलापूर शहरातील कामे

| अ.क्र. (१) | कामाचे नाव (२) |
|---|---|
| १ | सोलापूर-बार्शी रस्ता (राज्य मार्ग क्रमांक १५१) |
| २ | विमानतळ/होटगी रस्ता (प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ३९) |
| ३ | सोलापूर –अक्कलकोट राज्य मार्ग क्रमांक १५१ अक्कलकोट शहर वळणरस्त्यासह |
| ४ | सोलापूर-देगाव-बेगमपूर रस्ता (प्रमुख राज्य मार्ग क्रमांक ३) देगाव नाल्यावरील पुलाच्या उर्वरीत किंमतीसह. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
शासनाचे उप सचिव.

**PUBLIC WORKS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated the 30th March 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT.

No.PSP-2022/C.R.34/Road–8.— In exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*) and (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby declares that the toll shall be levied on the classes of motor vehicles specified in column (2) of the Schedule I appended hereto and on the trailers drawn by such motor vehicles, passing over any of the bridges, flyover bridges, Railway over or under bridges including approach roads thereto subways, sections of roads or by-passes situated within or on the periphery of Solapur which are being newly constructed, reconstructed, improved or repaired, or which form a part of Solapur City Integrated Road Development Project, more particularly described in Schedule II appended hereto, the cluster of which has been declared as one single entity for the purposes of section 20 of the said Act, under the 'Build, Operate and Transfer (BOT)' scheme at the rates, specified against each of the said motor vehicles in column (3) of the said Schedule I with effect from 1st April 2026 to 31st December 2026, at each of the following toll collection centers constructed at (1) Kilometer 7/650 on Solapur-Hotgi Road, Major District Road Number 39, (2) Kilometer 61/900 on Solapur-Barshi Road, State Highway Number 151, (3) Kilometer 365/950 on Solapur-Degaon Mangalwedha Road, Major State Highway Number 3 and (4) Kilometer 79/900 on Solapur-Akkalkot Road, State Highway Number 151.

*Schedule-I*

| **Sr. No.** | **Particulars of Motor Vehicles** | **Rates of toll per trip in rupees** |
|---|---|---|
| **(1)** | **(2)** | **(3)** |
| | | 01.04.2026 to 31.12.2026 |
| 1 | Motor cycle, Scooter, Moped or any other two wheeler, Tractor, with unladen trolley and auto Rickshaw Registered to carry three persons excluding driver. | Nil |
| 2 | Light Motor Vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988),<br>Car, Jeep, Tata Sumo, Tracks, Six Seater Auto Rickshaw (having carriage capacity upto twelve passengers, excluding driver); | Nil |
| | Mini bus or any other similar vehicles (having carriage capacity of more than twelve and upto twenty passengers, excluding driver) and goods carriage vehicles except vehicles included in entries at serial numbers 3 and 4 below. | 60 |
| 3 | Truck / Bus. | 105 |
| 4 | Heavy goods vehicles and heavy passenger motor Vehicles as defined in the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), such as Truck-Trailors combination Multi-axle Vehicles, etc., except vehicles covered by the entries at Serial number 3 above. | 125 |

*Notes.—*

(1) If a vehicle user purchases a toll coupon book in advance containing 50 or 100 coupons, he shall be given a discount of 25 per cent. and 50 per cent. respectively.

(2) The following types of motor vehicles are exempted from payment of toll, namely:-

(*i*) Central and State Government Vehicles.

(*ii*) Defence Vehicles.

(*iii*) Police Vehicles.

(*iv*) Fire Fighting Vehicles.

(*v*) Ambulances.

(*vi*) Hearses.

(*vii*) Vehicles of Post and Telegraph Department.

(*viii*) Vehicle carrying sitting members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council.

(*ix*) Vehicle in which ex members of Parliament, Maharashtra Legislative Assembly and Maharashtra Legislative Council are travelling.

(*x*) Buses of the Maharashtra State Road Transport Corporation (ST).

(*xi*) School Buses.

(3) For the purpose of this notification, the Maharashtra State Road Development Corporation Limited, Mumbai, is authorized to collect the toll at the above specified toll collection centres for the above mentioned period and retain the amount of the toll.

*Schedule – II*

The following roads, river bridges, including approach roads thereto, sections of roads, by-passes, service roads to by-passes and railway over or under bridges, have been declared as a single entity for the purpose of section 20 of the said Act.

**(A) Works Under Municipal Area**

| **Sr. No.** (1) | **Name of Work** (2) |
|---|---|
| 1 | Railway Over Bridge and Subway (level crossing number 55) |
| 2 | Railway Over Bridge (on the 200 ft. wide D.P Road) |
| 3 | Bhaiya Chowk to Koyana Nagar (widening of Railway Bridge and Bridge across Nalla) |
| 4 | Navi ves Chowki-Saraswati Chowk-Old employment Chowk-Rest house road |
| 5 | Shivaji Chowk –Samrat Chowk-Dayanand College-Boramani Naka-Ashok Chowk-Gurunanak Chowk to State Highway Number 13 (near Railway Bridge) |
| 6 | Old Pune Naka to State Highway Number 13 (SRP Camp, Soregaon) Outer Ring Road |
| 7 | Bhaiya Chowk-Mahapalika-Panchakatta-Vijapur ves Shanti Chowk. |
| 8 | Hotagi Road-Bharati Vidyapeeth-Railway Society-Chaitanya Shopping centre to State Highway Number 13 (road improvement including construction of Bridges) |
| 9 | Krishi Utpana Bajar samiti Chowk-Akkalkot Road-Lokmanya Chowk-Kumatha Naka-Hotgi Road-Jule Solapur State Highway Number 13. |
| 10 | Shivaji Chowk Bali ves – Tilak Chowk-Kontham Chowk-Kanya Chowk-Bhilabai Chowk. |

| Sr. No. (1) | Name of Work (2) |
|---|---|
| 11 | Gandhinagar – Government Hospital – Bara Imam Chowk – Kontham Chowk-Kumbhar ves-Balidan Chowk. |
| 12 | Improvement of 21 chowks in the Development plan. |
| 13 | Widening of Paras Estate to Samachar Chowk Road. |
| 14 | Zopadpatti Bhandar to Weavco Process. |

**(B) Roads in Solapur City under the Jurisdiction of Public Works Department**.

| Sr. No. (1) | Name of Work (2) |
|---|---|
| 1 | Solapur Barshi Road (State Highway Number 151) |
| 2 | Airport/Hotagi Road (Major District Road Number 39) |
| 3 | Solapur Akkalkot State Highway No. 151 with Akkalkot City Ring Road |
| 4 | Solapur-Degaon-Begampur Road (Major State Highway Number 3) including balance cost of bridge across Degaon Nalla. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANDEEP KHALATE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.